**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत नोंदणी व मुद्रांक विभागाच्या अधिसूचित सेवांचे शासन प्रक्रिया पुनर्रचना (Governance Process Re-engineering-GPR) अंतर्गत सुलभीकरण करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: मुद्रांक-२०२६/प्र.क्र.२१०/मुद्रांक-२**
**दालन क्र.एम-७ ए, पोटमाळा, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,मुंबई -४०० ०३२.**
**दिनांक : १३ ऑगस्ट, २०२६**

**वाचा**:

१. महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२३.०७.२०१५.
२. महाराष्ट्र शासन राजपत्र दि.०३.०८.२०१७.
३. महाराष्ट्र शासन राजपत्र दि.०६.०८.२०१८.
४. महसूल व वन विभागाचे पत्र दि.०१.०४.२०२६.
५. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव यांचे पत्र दि.२०.०५.२०२६.
६. मा. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांच्या अध्यक्षतेखाली दि.०३.०७.२०२६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.
७. महसूल व वन विभागाचे पत्र दि.१७.०७.२०२६.
८. नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाचे पत्र दि.२०.०७.२०२६.
९. Governance Process Re-engineering (GPR) संदर्भात बैठक दि.२१.०७.२०२६.
१०. नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाचे पत्र दि.२४.०७.२०२६.
११. नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२६/प्र.क्र.४७/का.१४११, दि.०३.०८.२०२६.

**प्रस्तावना :-**

मा. मुख्यमंत्री यांनी दिलेल्या निर्देशांनुसार राज्यामध्ये लोकाभिमुख सेवा अधिक पारदर्शक, सुलभ, कालबद्ध, नागरिकाभिमुख व पूर्णतः डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रक्रिया पुनर्रचना (Governance Process Re-engineering-GPR) राबविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने नियोजन विभागाच्या संदर्भ क्र.११ येथील शासन निर्णयान्वये सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिसूचित सेवा व योजनांचे सुलभीकरण करून सेवा वितरण अधिक परिणामकारक करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत नोंदणी व मुद्रांक विभागासाठी संदर्भ क्र.१ ते ३ अन्वये एकूण १५ सेवा अधिसूचित करण्यात आलेल्या आहेत. शासनाच्या निर्देशानुसार अधिसूचित सेवांचे पुनर्विलोकन करून सेवा प्रक्रियेचे सुलभीकरण, सेवांचे Rationalisation, आवश्यक कागदपत्रांची संख्या कमी करणे, अर्जातील Data Entry Fields कमी करणे, सेवा मंजुरी प्रक्रियेतील टप्पे कमी करणे, सेवांचे डिजिटायझेशन करणे, API आधारित प्रणाली एकत्रीकरण करणे तसेच नागरिकांना सेवा अधिक कार्यक्षम व पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी विभागामार्फत सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे.

त्याअनुषंगाने विविध स्तरांवर आयोजित बैठकीमध्ये विभागाच्या विभागाच्या अधिसूचित सेवांचे परीक्षण करण्यात आले. तसेच मा. मुख्यमंत्री सचिवालयाकडून प्राप्त निर्देश व नियोजन विभागाच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्त्वे विचारात घेऊन समान स्वरूपाच्या सेवांचे एकत्रीकरण (Merging), अनावश्यक सेवांचे विलोपन (Denotify), सेवा प्रक्रियेचे सुलभीकरण, कालमर्यादा सुसंगत करणे, तांत्रिक प्रणालींचे एकत्रीकरण, तसेच नागरिकाभिमुख ऑनलाईन सेवा वितरण व्यवस्था विकसित करण्याचा समाविष्ट करून नोंदणी व मुद्रांक विभागाच्या अधिसूचित सेवांमध्ये Governance Process Re-engineering (GPR) अंतर्गत सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**<u>शासन निर्णय :-</u>**

**१)** सेवांचे सुसूत्रीकरण (Service Rationalisation) (परिशिष्ट-अ प्रमाणे) -

नोंदणी व मुद्रांक विभागामार्फत महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत अधिसूचित सेवांचे शासन प्रक्रिया पुनर्रचना (Governance Process Re-engineering-GPR) अंतर्गत पुनर्विलोकन करण्यात आले असून, समान स्वरूपाच्या सेवांचे एकत्रीकरण (Merging), अनावश्यक सेवांचे विलोपन (Denotify), सेवा प्रक्रियेचे सुलभीकरण, सेवा वितरणाची कार्यक्षमता वाढविणे तसेच नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक व कालबद्ध सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने विभागाच्या अधिसूचित सेवांचे सुसूत्रीकरण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

त्यानुसार विभागाच्या अधिसूचित सेवांची संख्या १५ वरून १० इतकी सुधारित करण्यास मान्यता देण्यात येत असून त्याचा तपशील परिशिष्ट-अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहील. तसेच संबंधित सेवांपैकी G२C व G२B स्वरूपाच्या सेवा विभागामार्फत विकसित करण्यात आलेल्या ऑनलाईन प्रणालीद्वारे तसेच आवश्यकतेनुसार आपले सरकार व मैत्री पोर्टलशी एकत्रित करून उपलब्ध करून देण्यात येतील.

त्याअनुषंगाने, विभागामार्फत अधिसूचित सेवांपैकी समान स्वरूपाच्या सेवांचे एकत्रीकरण (Merge) पुढीलप्रमाणे करण्यात येत आहे :-

| सेवा अ.क्र. | विद्यमान अधिसूचित सेवेचे नाव | सुलभीकरणाअंतर्गत कार्यवाही | नवीन प्रस्तावित अधिसूचित सेवा |
|---|---|---|---|
| २ | संगणकीकृत प्रणालीमध्ये नोंदणी झालेल्या दस्तांच्या सूचीची नक्कल देणे | सेवा क्र. २, ३ व ९ या समान स्वरूपाच्या सेवांचे एकत्रीकरण (Merged as a Single Service) | नोंदणी झालेल्या दस्तांच्या सूचीची / दस्ताची प्रमाणित नक्कल देणे<br>प्रकार-१ : दुय्यम निबंधक / सह जिल्हा निबंधक कार्यालयात प्राप्त अर्ज.<br>प्रकार-२ : मैत्री कक्षाकडून प्राप्त अर्ज. |
| ३ | संगणकीकृत प्रणालीमध्ये नोंदणी झालेल्या दस्तांची प्रमाणित नक्कल देणे | | |
| ९ | सह जिल्हा निबंधक कार्यालयात नोंदणी झालेल्या दस्तांची / सूचीची प्रमाणित नक्कल देणे | | |
| १२ | विशेष विवाह कायदा, १९५४ अन्वये विवाह संपन्न करणे | सेवा क्र. १२ व १४ चे एकत्रीकरण (Merged as a Single Service) | विशेष विवाह कायदा, १९५४ अन्वये विवाह संपन्न करणे / इतर पद्धतीने अगोदरच झालेल्या |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | इतर पद्धतीने अगोदरच झालेल्या विवाहाची विशेष विवाह कायदा अंतर्गत नोंदणी करणे | | विवाहाची विशेष विवाह कायदा, १९५४ अंतर्गत नोंदणी करणे. |

तसेच,

विभागामार्फत विलोपित (Denotify) करावयाच्या अधिसूचित सेवांचा तपशील पुढीलप्रमाणे राहील :-

| **सेवा क्र.** | **विद्यमान अधिसूचित सेवा** | **विलोपित (Denotify) करण्यात येणारी सेवा** | **कार्यवाही** |
|---|---|---|---|
| ८ | विशेष कुलमुखत्यारपत्राचे अधिप्रमाणन करून देणे | विशेष कुलमुखत्यारपत्राचे अधिप्रमाणन करून देणे | सदर सेवा विलोपित (Denotify) करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क आयोगाकडे आवश्यक प्रस्ताव सादर करून पुढील कार्यवाही करण्यात यावी. |
| ११ | मृत्यूपत्राचा सीलबंद लखोटा जमा करणे, परत घेणे व उघडणे | मृत्यूपत्राचा सीलबंद लखोटा जमा करणे, परत घेणे व उघडणे | |

उपरोक्त सुलभीकरणानुसार नोंदणी व मुद्रांक विभागाच्या अधिसूचित सेवांची संख्या पुढीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे :-

| **सेवा प्रकार** | **GPR पूर्वी सेवा संख्या** | **GPR नंतर सेवा संख्या** |
|---|---|---|
| फक्त शासन ते नागरिक (G२C) | १३ | ३ |
| शासन ते नागरिक (G२C) व शासन ते व्यावसायिक (G२B) | ०२ | ७ |
| एकूण अधिसूचित सेवा | १५ | १० |

वरीलप्रमाणे, उपरोक्त सुधारित अधिसूचित सेवा परिशिष्ट-अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे लागू राहतील. तसेच या सेवा विभागामार्फत विकसित करण्यात आलेल्या ऑनलाईन प्रणालीद्वारे उपलब्ध करून देण्यात येतील.

उक्त सेवांपैकी G२C या सेवा आपले सरकार पोर्टलद्वारे (https://aaplesarkar.maharashtra.gov.in) तर G२B या सेवा मैत्री पोर्टलद्वारे (https://maitri.maharashtra.gov.in) प्रदान करण्यात येणार आहेत. तसेच G२C व G२B या दोन्हीद्वारे उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या सेवा आपले सरकार पोर्टलव व मैत्री पोर्टलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. यामधील अधिसूचित सेवांचे शुल्क महाराष्ट्र नोंदणी नियम, १९६१ अंतर्गत Table of Fees मधील प्रस्तावित नवीन शुल्काप्रमाणे देय राहील.प्रस्तावित नवीन शुल्क पुढीलप्रमाणे राहील:-

| **अ.क्र.** | **अनुच्छेद** | | **सध्याचे दर** | **प्रस्तावित दर** |
|---|---|---|---|---|
| १. | अनुच्छेद १०- अभिलेख शोध | | | |
| | अ | एखाद्या मिळकतीशी (एकाच दस्तातील) संबंधित संगणक प्रणालीद्वारे तयार झालेल्या प्रत्येक नोंदीची एका विशिष्ट दस्ताची/सूचीची) तपासणी / पाहणी | रु.२५/- | रु.५०/- |
| | ब | संगणकीकृत प्रणालीमध्ये उपलब्ध असलेल्या प्रत्येक दस्ताच्या संदर्भातील किंवा प्रत्येक मालमत्तेच्या संदर्भातील प्रत्येक नोंदीसाठी | पहिल्या १२ वर्षाकरीता रु.३००/- व पुढील प्रत्येक वर्षाकरीता प्रति वर्ष रु.२५/- | प्रति १० वर्ष किंवा त्याचे भागास रु.५००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | अनुच्छेद १४- अभिलेख शोध | | | | | |
| | अ | (i) | | संगणकीकृत डिजिटली साईन्ड प्रत (PDF etc.) | सध्या दर विहीत नाहीत. (ऑनलाईन प्रणालीमध्ये Copy Download मधून विना सहिची File साठी रु.१००/- घेतले जातात) | रु.१००/-पहिल्या २० पानांकरीता त्यानंतर प्रति पान रु.२/- |
| | | ii) | | कागदीस्वरुपातील प्रत | | |
| | | | १) | स्कॅन्ड इमेजवरुन प्रिंट करुन दिलेली प्रत | प्रति पान रु.५/- | प्रति पान रु.२५/- |
| | | | २) | इतर प्रकरच्या अभिलेखावरुन फोटो कॉपी करुन दिलेली प्रत | प्रति पान रु.२०/- | प्रति पान रु.२५/- |
| | ब | सुची क्र.१,२,३ किंवा ४ ची प्रमाणित प्रत | | | | |
| | | i) | | संगणीकृत पध्दतीने तयार झालेली व डिजीटली साईन्ड झालेली प्रत (PDF etc) | सध्या दर विहीत नाहीत. (ऑनलाईन प्रणालीमध्ये Copy Download मधून विना सहीची File साठी रु.२५/- घेतले जातात) | रु.२५/- |
| | | ii) | | कागदी स्वरुपातील प्रत | रु.५/- | रु.५०/- |
| | अनुच्छेद २२ - दस्त नोंदणीसाठीची गृहभेट | | | | रु.३००/- | रु.५०००/- |

**२)** सेवा मंजुरी प्रक्रियेतील टप्पे कमी करणे (Minimizing Desk) व तांत्रिक एकत्रीकरण (Service Delivery Process Simplification & System Integration) –

नोंदणी व मुद्रांक विभागाच्या अधिसूचित सेवांची कार्यक्षमता वाढविणे, सेवा वितरणाची कालमर्यादा कमी करणे, नागरिकांना अधिक सुलभ व पारदर्शक सेवा उपलब्ध करून देणे तसेच शासन प्रक्रिया पुनर्रचना (Governance Process Re-engineering-GPR) प्रभावीपणे अंमलात आणण्याच्या दृष्टीने विभागाच्या सेवा मंजुरी प्रक्रियेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे :-

१. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत अधिसूचित सेवांचे Rationalisation करून सुधारित सेवा प्रक्रियेनुसार अर्जांची छाननी, पडताळणी व मंजुरीची कार्यपद्धती निश्चित करण्यात यावी.
२. विभागामार्फत प्रस्तावित अधिसूचित सेवांचे तांत्रिक विकसन (Technical Development) विभागाच्या विद्यमान संगणकीय प्रणालीमध्येच करण्यात यावे.
३. सद्यस्थितीत विभागाकडील iSARITA प्रणालीमध्ये Land Records, Aadhaar, PAN, Corporation तसेच इतर शासकीय प्रणालींसोबत आवश्यक API Integration उपलब्ध असल्याने सदर प्रणालीचा वापर करून नागरिकांना ऑनलाईन सेवा उपलब्ध करून देण्यात याव्यात.
४. शासनाच्या इतर प्रशासकीय विभागांप्रमाणे अधिसूचित सेवा आपले सरकार पोर्टल व मैत्री पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात याव्यात. तथापि, नोंदणी व मुद्रांक विभागाकडे कार्यरत असलेली ऑनलाईन प्रणाली व तांत्रिक यंत्रणा विचारात घेता, सदर सेवांचे Application

Development, Business Logic, Workflow Management व Database Management विभागामार्फतच करण्यात यावे.

५. विभागामार्फत विकसित करण्यात आलेल्या ऑनलाईन सेवांसाठी आवश्यक URL / Front-end Interface महाआयटीस उपलब्ध करून देण्यात यावा, जेणेकरून सदर सेवा आपले सरकार पोर्टल व मैत्री पोर्टल वर थेट उपलब्ध करून देता येतील.

६. महाआयटीमार्फत स्वतंत्रपणे सेवा विकसित करण्याऐवजी विभागामार्फत विकसित प्रणालीचे आवश्यक Integration करण्यात यावे, जेणेकरून समन्वयाअभावी होणारा तांत्रिक विलंब टाळता येईल व सेवा अखंडितपणे उपलब्ध राहतील.

७. विभागामार्फत प्रस्तावित सर्व अधिसूचित सेवांचे Governance Process Re-engineering (GPR) पूर्ण करून आवश्यक Software Development, API Integration, Digital Workflow व Online Service Delivery यांची कार्यवाही विभागामार्फत पूर्ण करण्यात यावी.

**३)** कागदपत्रांची संख्या कमी करणे (Minimizing Documents) :-

नागरिकांना सेवा सुलभतेने उपलब्ध करून देण्यासाठी तसेच अर्ज प्रक्रियेमध्ये अनावश्यक कागदपत्रांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

१. शासनाच्या इतर प्रणालींमध्ये उपलब्ध असलेली अथवा विभागाकडे पूर्वीपासून उपलब्ध असलेली माहिती अर्जदाराकडून पुन्हा मागविण्यात येऊ नये.

२. शक्य त्या सर्व सेवांसाठी API आधारित माहितीची देवाणघेवाण (System Integration) करण्यात यावी.

३. DigiLocker, Aadhaar, PAN, Land Records, Corporation तसेच इतर शासकीय प्रणालीमधून उपलब्ध होणारी कागदपत्रे नागरिकांकडून सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

४. अर्जातील Data Entry Fields शक्य तितके कमी करून Auto Fetch / Auto Fill सुविधेचा वापर करण्यात यावा.

५. नागरिकांकडून केवळ कायद्याने आवश्यक असलेली कागदपत्रेच मागविण्यात यावीत. अनावश्यक कागदपत्रे मागविण्यात येऊ नयेत.

६. अनावश्यक कागदपत्रे मागविण्यात येऊ नये.

७. आवश्यक त्या ठिकाणी स्वयंघोषणापत्रास प्राधान्य देण्यात यावे.

**४)** प्रतिज्ञापत्रांचे सुसूत्रीकरण (Affidavit Rationalisation) -

ज्या सेवांमध्ये कायद्याने प्रतिज्ञापत्र सादर करणे अनिवार्य नाही, अशा सेवांसाठी प्रतिज्ञापत्राऐवजी आवश्यकतेनुसार स्वयंघोषणापत्र (Self Declaration) स्वीकारण्यात यावे. तसेच विभागाच्या सेवा वितरण प्रक्रियेत नागरिकांवरील अनावश्यक अनुपालनाचा (Compliance) भार कमी करण्यासाठी आवश्यक ते प्रशासकीय आदेश नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निर्गमित करावेत.

**५)** ऑनलाइन सेवा वितरण, शुल्क व सेवा कालमर्यादा (Online Service Delivery, Fees & Timelines) –

१. विभागामार्फत प्रस्तावित दहा अधिसूचित सेवांसाठी स्वतंत्र ऑनलाईन प्लॅटफॉर्म विकसित करण्यात आलेला असून सदर सेवा विभागाच्या प्रणालीमार्फत ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात याव्यात.

२. सदर ऑनलाईन सेवांचे आवश्यक Integration आपले सरकार पोर्टल व मैत्री पोर्टलशी करण्यात यावे.
३. सेवा क्रमांक २, ३ व ८ साठी WhatsApp Integration विकसित करण्याची कार्यवाही विभागामार्फत करण्यात यावी.
४. महाराष्ट्र लोकसेवा हक्क आयोगाच्या निर्देशानुसार अधिसूचित सेवांची सुधारित कालमर्यादा परिशिष्ट-अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे लागू राहील.
५. नोंदणी व मुद्रांक विभागातील अधिसूचित सेवांबाबत शुल्कामध्ये सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र नोंदणी नियम, १९६१ मधील Table of Fees मध्ये आवश्यक सुधारणा स्वतंत्र अधिसूचनेद्वारे करण्यात येतील.
६. नोंदणीकृत दस्तांच्या प्रमाणित प्रती, e-Search, Home Visit, विशेष विवाह अधिनियमांतर्गत सेवा तसेच इतर सेवांबाबतचे सुधारित शुल्क शासनाकडून स्वतंत्र अधिसूचना निर्गमित झाल्यानंतर लागू राहील.

**६)** मानक कार्यपद्धती (Standard Operating Procedure - SOP) -

नोंदणी व मुद्रांक विभागामार्फत शासन प्रक्रिया पुनर्रचना (Governance Process Re-engineering-GPR) अंतर्गत सुधारित करण्यात आलेल्या अधिसूचित सेवांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मा. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आवश्यक ती मानक कार्यपद्धती (Standard Operating Procedure-SOP), तांत्रिक सूचना, कार्यप्रवाह (Workflow), सेवा वितरणाची पद्धत, प्रणालीतील आवश्यक बदल तसेच प्रशासकीय मार्गदर्शक सूचना निर्गमित कराव्यात.

**७)** सेवा वितरणाची ऑनलाइन अंमलबजावणी -

नोंदणी व मुद्रांक विभागामार्फत प्रस्तावित अधिसूचित सेवांचे शासन प्रक्रिया पुनर्रचना (GPR) नुसार आवश्यक तांत्रिक विकास पूर्ण करून सदर सेवा पूर्णतः ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून देण्यात याव्यात.

सदर सेवांसाठी आवश्यक डिजिटल कार्यप्रवाह (Digital Workflow), API Integration, Online Verification, Online Certificate Generation, Status Tracking, Digital Record Management तसेच

इतर आवश्यक प्रणाली विकसित करण्याची कार्यवाही विभागामार्फत करण्यात यावी.
विभागामार्फत विकसित करण्यात आलेल्या प्रणालीचे आवश्यक Integration आपले सरकार पोर्टल व मैत्री पोर्टल यांच्याशी करण्यात यावे, जेणेकरून नागरिकांना एकाच व्यासपीठावरून सेवा उपलब्ध होतील.

**८)** शुल्कासंदर्भातील कार्यवाही -

नोंदणी व मुद्रांक विभागाच्या अधिसूचित सेवांसाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये आवश्यक सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र नोंदणी नियम, १९६१ मधील Table of Fees मध्ये आवश्यक ते बदल करण्याची कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात यावी.

नोंदणीकृत दस्तांच्या प्रमाणित प्रती, e-Search, Home Visit, विशेष विवाह अधिनियम, १९५४ अंतर्गत सेवा तसेच इतर सेवांबाबतचे सुधारित शुल्क स्वतंत्र अधिसूचना निर्गमित झाल्यानंतर लागू राहील.

**९)** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत कार्यवाही -

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत अधिसूचित सेवांचे Rationalisation करून सुधारित १० अधिसूचित सेवांची अधिसूचना निर्गमित करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. तसेच, विलोपित (Denotify) करण्यासाठी प्रस्तावित सेवांबाबत महाराष्ट्र लोकसेवा हक्क आयोगाकडे आवश्यक प्रस्ताव सादर करून पुढील कार्यवाही करण्यात यावी.

**१०)** पूर्वीच्या आदेशांचे अधिक्रमण -

सदर शासन निर्णयाशी विसंगत असलेले या विषयासंदर्भातील यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले सर्व शासन निर्णय, शासन परिपत्रके, आदेश व मार्गदर्शक सूचना, या शासन निर्णयाच्या अंमलबजावणीपुरत्या अधिक्रमित करण्यात येत आहेत.

**११)** अंमलबजावणी -

या शासन निर्णयाच्या अनुषंगाने शासन प्रक्रिया पुनर्रचना (GPR) अंतर्गत सुधारित अधिसूचित सेवांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक तांत्रिक, प्रशासकीय व प्रक्रियात्मक कार्यवाही मा. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी तात्काळ पूर्ण करावी.

**०४.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संगणक संकेतांक २०२६०८१३१८०६०२९६४८ असा आहे. हा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ

Digitally signed by SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=559498df564ab1121a356349085c1b8e3cc0f12569ba0f7f2090386d4dccb333, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F7145AF5949FB706E2DCB06C2B209B58FFA369F6E085E02041722C90F0528791, cn=SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ
Date: 2026.08.13 18:06:56 +05'30'

**(सत्यनारायण बजाज)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्री महोदयांचे सचिव,मंत्रालय,मुंबई.
४. सर्व मा.मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
५. मा. सभापती. विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई.
६. मा. अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
७. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
८. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११. अपर मुद्रांक नियंत्रक,प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई.
१२. महालेखापाल-१ व २ (मुंबई/नागपूर)महाराष्ट्र राज्य.
१३. सर्व जिल्हाधिकारी/सर्व नोंदणी उप महानिरीक्षक व मुद्रांक उप नियत्रंक/ सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी.
१४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१५. निवडनस्ती, कार्यासन म-१(धोरण), महसूल व विभाग, मंत्रालय,मुंबई.

## <u>परिशिष्ट – अ</u>

## शासन प्रक्रिया पुनर्रचना (Governance Process Re-engineering-GPR) नंतर सुधारित अधिसूचित सेवांचा तपशील

| अ. क्र. | लोकसेवेचा तपशील | लोकसेवा पुरवण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा | पदनिर्देशित अधिका-याचे पदनाम | प्रथम अपीलीय अधिका-याचे पदनाम | द्वितीय अपीलीय अधिका-याचे पदनाम |
|---|---|---|---|---|---|
| १ | दस्त नोंदणी करणे<br>----------------<br>प्रकार -१ थेट प्राप्त.<br>----------------<br>प्रकार २- मैत्री कक्षाकडून प्राप्त अर्ज | १ दिवस | संबंधित दुय्यम निबंधक | संबंधित सह जिल्हा निबंधक<br>-------------<br>नोडल अधिकारी मैत्री कक्ष | संबंधित नोंदणी उपमहानिरीक्षक<br>-------------<br>अध्यक्ष, मैत्री कक्ष |
| २ | नोंदणी झालेल्या दस्तांच्या सूचीची /दस्ताची प्रमाणित नक्कल देणे.<br>------------------<br>प्रकार-१ – दुय्यम निबंधक / सह जिल्हा निबंधक कार्यालयात प्राप्त अर्ज.<br>------------------<br>प्रकार २- मैत्री कक्षाकडून प्राप्त अर्ज | ३ दिवस | संबंधित दुय्यम निबंधक / संबंधित सह जिल्हा निबंधक | संबंधित सह जिल्हा निबंधक/ संबंधित नोंदणी उपमहानिरीक्षक<br>--------------<br>नोडल अधिकारी मैत्री कक्ष | संबंधित नोंदणी उपमहानिरीक्षक/ नोंदणी महानिरीक्षक<br>-------------<br>अध्यक्ष, मैत्री कक्ष |
| ३ | नोंदणीकृत दस्तांच्या सूचींचा शोध उपलब्ध करुन देणे.<br>प्रकार-१ – दुय्यम निबंधक / सह जिल्हा निबंधक कार्यालयात प्राप्त अर्ज.<br>------------------<br>प्रकार २- मैत्री कक्षाकडून प्राप्त अर्ज | १ दिवस | संबंधित दुय्यम निबंधक / संबंधित सह जिल्हा निबंधक | संबंधित सह जिल्हा निबंधक/ संबंधित नोंदणी उपमहानिरीक्षक<br>--------------<br>नोडल अधिकारी मैत्री कक्ष | संबंधित नोंदणी उपमहानिरीक्षक/ नोंदणी महानिरीक्षक<br>-------------<br>अध्यक्ष, मैत्री कक्ष |
| ४ | नोटीस ऑफ इंटिमेशन फाईल करुन घेणे.<br>------------------<br>प्रकार-१ – दुय्यम निबंधक कार्यालयात प्राप्त अर्ज.<br>------------------<br>प्रकार २- मैत्री कक्षाकडून प्राप्त अर्ज | १ दिवस | संबंधित दुय्यम निबंधक | संबंधित सह जिल्हा निबंधक<br>--------------<br>नोडल अधिकारी मैत्री कक्ष | संबंधित नोंदणी उपमहानिरीक्षक<br>-------------<br>अध्यक्ष, मैत्री कक्ष |
| ५ | मुद्रांक शुल्क भरण्याचे प्रयोजनार्थ मूल्यांकन अहवाल देणे.<br>प्रकार-१ – दुय्यम निबंधक कार्यालयात प्राप्त | ३ दिवस | संबंधित दुय्यम निबंधक | संबंधित सह जिल्हा निबंधक<br>-------------- | संबंधित नोंदणी उपमहानिरीक्षक<br>------------- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | अर्ज.<br>------------------<br>प्रकार २- मैत्री कक्षाकडून प्राप्त अर्ज | | | नोडल अधिकारी मैत्री कक्ष | अध्यक्ष, मैत्री कक्ष |
| ६ | दस्त नोंदणीसंदर्भात गृहभेट देणे | ५ दिवस | संबंधित दुय्यम निबंधक | संबंधित सह जिल्हा निबंधक | संबंधित नोंदणी उपमहानिरीक्षक |
| ७ | विशेष विवाह कायदा,१९५४ अन्वये विवाह संपन्न करणे<br>----------------<br>इतर पध्दतीने अगोदरच झालेल्या विवाहाची विशेष विवाह कायदा, १९५४ अंतर्गत नोंदणी करणे | पूर्वनियोजित वेळेनुसार १ दिवस | संबंधित विवाह अधिकारी | संबंधित सह जिल्हा निबंधक | संबंधित नोंदणी उपमहानिरीक्षक |
| ८ | विवाह प्रमाणपत्राच्या प्रमाणित नकला देणे. | ३ दिवस | संबंधित विवाह अधिकारी | संबंधित सह जिल्हा निबंधक | संबंधित नोंदणी उपमहानिरीक्षक |
| ९ | दस्त नोंदणी न केलेल्या प्रकरणांमध्ये ईपेमेंट पध्दतीने भरलेल्या नोंदणी फीचा परतावा.<br>प्रकार-१ – सह जिल्हा निबंधक कार्यालयात प्राप्त अर्ज.<br>------------------<br>प्रकार २- मैत्री कक्षाकडून प्राप्त अर्ज | २२ दिवस | संबंधित सह जिल्हा निबंधक | संबंधित नोंदणी उपमहानिरीक्षक<br>--------------<br>नोडल अधिकारी मैत्री कक्ष | नोंदणी महानिरीक्षक<br>-------------<br>अध्यक्ष, मैत्री कक्ष |
| १० | दस्तांचा अभिनिर्णय करणे<br>**प्रकार १-** थेट दाखल अर्ज<br>**प्रकार** २- मैत्री कक्षाकडून प्राप्त अर्ज | ४५ दिवस | सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी / संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी -------------<br>संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी / सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी | संबंधित नोंदणी उपमहानिरीक्षक / अप्पर मुद्रांक नियंत्रक<br>--------------<br>नोडल अधिकारी, मैत्री कक्ष | सह नोंदणी महानिरीक्षक/ नोंदणी महानिरीक्षक<br>-------------<br>अध्यक्ष, मैत्री कक्ष |

*******